# जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
## जाहीर प्रगटन

**रद्दी खरेदी दरप्रत्रकासाठी खालील नियम , शर्ती व अटी लागू राहतील.**

१. प्रत्येक निवीदाकारास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.

२. या कार्यालयाच्या फायदयाच्या दृष्टीने सर्वात जास्त किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येईल

३. रद्दी खरेदीदार निवीदाकाराला अधिकृत खरेदीदार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्र. नमुद करणे बंधनकारक राहील. व नो.शासनमान्य परवाना असणे आवश्यक आहे.

४. निवीदाकाराला दरपत्रका सोबत निवीदाकाराचे पॅनकार्डची छायांकित प्रत देणे बंधनकाराक राहिल.

५. दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या चार्जेसचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

६. सदर रद्दी कार्यालयातुन वाहतूक करण्याकरिता कार्यालयामार्फत वाहन भाडे, हमाली व इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच तालुका न्यायालयातील रद्दीही त्यांनी स्वखर्चाने उचलावी लागेल, त्यासाठीही खर्च देण्यात येणार नाही.

७. कार्यालयात गठीत समिती समोर रद्दी मोजण्यात येईल.

८. दरपत्रक सादर करणा—या निवीदाकारांचा या कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबध नसावा यांची नोंद घ्यावी.

९. दरपत्रक सादर करताना त्यामध्ये संदर्भाचा उल्लेख करणे बंधनकारक आहे.

१०. रद्दी न्यायालयाच्या आवाराबाहेर नेल्यानंतर त्यांच्या विल्हेवाटी संदर्भात सर्व जबाबदारी संबंधित रद्दी खरेदीदाराची राहिल.

११. मोहोरबंद दरपत्रके ही जिल्हा न्यायालय बीड गठीत केलेल्या समिती यांचे समक्ष दि. ०४/११/२०२३ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता जिल्हा न्यायाधीश —६ बीड यांचे निजी कक्षात उघडण्यात येतील. जर तांत्रीक अडचणी निर्माण झाल्यास दुस—या दिवशी ठरलेल्या वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

१२. निविदा/दरपत्रक दिनांक. ०३/११/२०२३ पर्यत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५. ०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील प्राप्त निविदा/दरपत्रक दिनांक. ०४/११/२०२३ रोजी गठीत समितीसमोर उघडण्यात येतील. यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी

योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहु शकतो. प्रशासकीय व कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाहीतर लगतच्या दिनांकास अथवा कार्यालयाच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.

१३. सदरील दरपत्रके स्वीकारण्याचा व नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड राखून ठेवत आहे.

१४. दिलेल्या मुदतीत आपले दरपत्रक या कार्यालयास सादर न झाल्यास वरील संपूर्ण अटी आपणांस मान्य नाहीत असे समजण्यात येईल.

१५. सदर दरपत्रक मंजूर झालेल्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीकरीता वैध राहिल.

१६.जिल्हा मध्यवर्ती अभिलेख कक्षात जमा झालेली रद्दी ही दरमहा घेवुन जाणे संबंधीत ठेकेदारास बंधनकाराक राहिल.

तरी संबंधित ठेकेदारांना सूचित करण्यात येते की, सदर रद्दी खरेदी करण्याकरिता आपली सिलबंद निविदा दरपत्रक मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब. जिल्हा न्यायालय बीड यांच्या नावे दि.०३/११/२०२३ सादर करावे.

आदेशावरुन,

प्रबंधक

जिल्हा व सत्र न्यायालय बीड